# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

**(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)**

**मुक्त व दूरस्थ अध्ययन प्रशाळा**

आय.डी.एस. इमारत, सेट गेस्ट
हाउसशेजारी आयुका रस्ता,
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
दूरध्वनी 02025622385/6/7

**डॉ. वैभव जाधव**
**संचालक**
**(अतिरिक्त कार्यभार)**

**मु.अ.प्र/जा.क्र/२०२०-२१/१२०५** **दि. २३.०९.२०२१**

**शैक्षणिक वर्ष २०१९-२० मध्ये प्रवेशित विद्यार्थ्यांकरिता सूचना**

मुक्त अध्ययन प्रशाळेमध्ये शैक्षणिक वर्ष २०१९-२० मध्ये प्रथम वर्षास प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांचा प्रथम वर्ष परीक्षेचा निकाल जाहीर करण्यात आलेला आहे.

जे विद्यार्थी या परीक्षेमध्ये अनुत्तीर्ण झालेले आहेत किंवा परीक्षा देऊ न शकलेल्या विद्यार्थ्यांना पुनर्परीक्षा देण्यासाठी परीक्षा अर्ज भरणे आवश्यक आहे. सदर अर्ज sppu.digitaluniversity.ac या संकेतस्थळावर दि. २६ सप्टेंबर २०२१ पर्यंत भरणे आवश्यक आहे.

जे विद्यार्थी अंतर्गत परीक्षेमध्ये अनुत्तीर्ण आहेत अशा विद्यार्थ्यांना ३०गुणांची अंतर्गत पुनर्परीक्षा द्यावी लागेल. जे विद्यार्थी वार्षिक परीक्षेमध्ये अनुत्तीर्ण आहेत अशा विद्यार्थ्यांना ७० गुणांची वार्षिक पुनर्परीक्षा द्यावी लागेल. अंतर्गत पुनर्परीक्षा तसेच वार्षिक पुनर्परीक्षा ही ऑनलाईन पद्धतीने बहुपर्यायी स्वरुपाची होईल.

३० गुणांच्या अंतर्गत पुनर्परीक्षेचे वेळापत्रक हे प्रशाळेच्या unipune.ac.in/sol या संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात येणार आहे. संबंधित विद्यार्थ्यांनी सदर संकेतस्थळास नियमितपणे भेट देऊन वेळोवेळी दिल्या जाणाऱ्या सूचनांची दखल घ्यावी.

७० गुणांच्या वार्षिक पुनर्परीक्षेचे वेळापत्रक हे विद्यापीठाच्या परीक्षा व मुल्यमापन मंडळ यांचेकडून जाहीर करण्यात येणार आहे. यासंदर्भातील सविस्तर सूचना ही परीक्षा व मूल्यमापन मंडळ यांच्या http://exam.unipune.ac.in या संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात येणार आहे. संबंधित विद्यार्थ्यांनी सदर संकेतस्थळास नियमितपणे भेट देऊन वेळोवेळी दिल्या जाणाऱ्या सूचनांची दखल घ्यावी.

*Sd/-*
**संचालक**
**मुक्त व दूरस्थ अध्ययन प्रशाळा**